महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : १८९ वा | दिनांक : १६/०५/२०२५ | वार : शुक्रवार

## सरन्यायाधीशांनी शपथ घेतल्यानंतर पहिलाच निकाल महाराष्ट्रातील प्रकरणाचा लावला



**मुंबई** : भारताचे ५२ वे सरन्यायाधीश भूषण गवई यांनी शपथ घेतल्यानंतर पहिलाच निकाल महाराष्ट्रातील एका प्रकरणावर दिला आहे. या निकालामुळे भाजपचे खासदार नारायण राणे यांना मोठा धक्का बसला आहे. १९९८ साली युती सरकार असताना नारायण राणे हे महसूल मंत्री होते. यावेळी त्यांनी पुण्यातील वन विभागाची ३० एकर जमीन एका बिल्डरला देण्याचा निर्णय घेतला होता. सरन्यायाधीश भूषण गवई यांनी हा निर्णय रद्द केला आहे. त्यामुळे नारायण राणे यांना दणका बसला आहे.

भारताचे सरन्यायाधीश म्हणून भूषण गवई यांनी दिलेला पहिला निकाल पुण्यातील वन विभागाच्या जमिनीशी संबंधित होता. कोंढवा भागातील शेकडो कोटी रुपये मूल्यमान असलेली ३० एकर जमीन एका बिल्डरला देण्याचा निर्णय हा राजकारणी, प्रशासकीय अधिकारी आणि खासगी बिल्डर यांच्यातील साटेलोटे संबंधाचे ठळक उदाहरण असल्याचे त्यांनी या निकालात नमूद केले.

या जमिनीवर 'रिची रिच' नावाची गृहनिर्माण सोसायटी उभारण्यासाठी जमीन बिल्डरला देण्यात आली होती. यासाठी पुरातत्व खात्याच्या नोंदींमध्ये जाणीवपूर्वक बदल करण्यात आले होते. या सगळ्या प्रकाराचा पर्दाफाश झाल्यानंतर, सरन्यायाधीश गवई यांनी या व्यवहारातील सर्व निर्णय बेकायदेशीर ठरवत ती जमीन पुन्हा वन विभागाच्या ताब्यात देण्याचा महत्वपूर्ण निर्णय दिला.

पुण्याच्या कोंढवा भागातील ३० एकर जमीन ही मूळतः वन विभागाच्या मालकीची असतानाही, १९९८ मध्ये त्या वेळचे महसूल मंत्री नारायण राणे यांनी ती चव्हाण नावाच्या व्यक्तीला देण्याचा निर्णय घेतला. चव्हाण यांनी ही जमीन स्वतःची शेतजमीन असल्याचा दावा केला होता. मात्र, जमीन मिळताच त्यांनी ती केवळ दोन कोटी रुपयांना 'रिची रिच' सहकारी गृहनिर्माण संस्थेला विकली.

या व्यवहारानंतर काही दिवसांतच, पुण्याचे विभागीय आयुक्त राजीव अग्रवाल, जिल्हाधिकारी विजय माथनकर आणि उपवन संरक्षक अशोक खडसे यांनी ही जमीन 'बिगर शेती' म्हणून प्रमाणित केली. यामुळे त्या जमिनीवर बांधकाम करण्याचा मार्ग मोकळा झाला.

'रिची रिच' सोसायटी या ठिकाणी १,५५० फ्लॅट्स, तीन क्लब हाउसेस, ३० रो हाउसेस आणि एक भव्य शॉपिंग कॉम्प्लेक्स उभारण्याचा प्रकल्प होता. हा प्रकल्प सिटी ग्रुपचे अनिरुद्ध देशपांडे, ऑक्सफर्ड प्रॉपर्टीज आणि रहेजा बिल्डर्स यांनी मिळून राबवायचा होता. मात्र, या निर्णयाविरोधात पुण्यातील 'सजग चेतना मंच' या संस्थेने सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली. या याचिकेत, पुण्याच्या मध्यवर्ती भागातील वनजमीन खासगी बिल्डरला देणे पर्यावरणासाठी घातक असल्याचे नमूद करण्यात आले होते.

या प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन सर्वोच्च न्यायालयाने मे २००२ मध्ये तपासासाठी 'सेंट्रली एम्पॉवर्ड कमिटी' स्थापन केली. समितीचे अध्यक्ष पी. व्ही. जयकृष्णन, सदस्य एम. के. जीवराजिका आणि ए. डी. एन. राव यांनी पुण्यात येऊन संबंधित जागेची पाहणी करून आपला अहवाल न्यायालयात सादर केला. या अहवालात नारायण राणे यांच्यासह संबंधित अधिकाऱ्यांवर कठोर कारवाईची शिफारस करण्यात आली होती. मात्र, प्रत्यक्षात केवळ उपवन संरक्षक अशोक खडसे यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला.

या जागेसंबंधी न्यायालयीन लढाई सुरू असल्याने प्रत्यक्षात कोणतेही बांधकाम झाले नाही. दरम्यान, रिची रिच सोसायटीने ही जागा बिगर शेती असल्याचा दावा करत पुरावा म्हणून राज्याच्या पुरातत्व विभागाच्या मुंबईतील काळा घोडा कार्यालयातील काही दस्तऐवज डिसेंबर २०२३ मध्ये न्यायालयात सादर केले. मात्र, वन विभागाने या पुराव्यांवर शंका उपस्थित केली आणि पुरातत्व विभागाला विचारणा केली.

या चौकशीत असे आढळून आले की, संबंधित ब्रिटिशकालीन रेकॉर्डमध्ये फेरफार करण्यात आले होते. त्या दस्तऐवजाचे शेवटचे अर्ध पान कोरे ठेवून नंतर नव्याने मजकूर छापण्यात आला होता. सर्वोच्च न्यायालयाला दिशाभूल करण्यासाठी हा बनाव रचल्याचे उघड झाले. या प्रकरणाचा तपास जानेवारी २०२४ मध्ये सीआयडीकडे सोपवण्यात आला. वन विभागाने या सर्व तथ्यांची माहिती सर्वोच्च न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिली.

अखेर, 'वन विभाग विरुद्ध रिची रिच सोसायटी' या खटल्यात भारताचे सरन्यायाधीश भूषण गवई यांनी निकाल देताना, संपूर्ण प्रक्रिया बेकायदेशीर ठरवत, वादग्रस्त ३० एकर जमीन पुन्हा वन विभागाच्या ताब्यात देण्याचा ऐतिहासिक निर्णय दिला.

## शरद पवार आमच्यासोबत असते तर राष्ट्रपती झाले असते

**जालना** : शरद पवार महायुतीसोबत असते तर आज राष्ट्रपती झाले असते. आताही त्यांचे स्वागतच आहे, असे महत्वपूर्ण विधान केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांनी गुरुवारी येथे बोलताना केले. राज्याच्या राजकारणात राष्ट्रवादी काँग्रेसच्या दोन्ही गटांच्या एकीकरणाची चर्चा रंगली आहे. या पार्श्वभूमीवर आठवले यांनी विधान केल्यामुळे त्याला मोठे महत्त्व प्राप्त झाले आहे.

रामदास आठवले गुरुवारी जालन्याच्या दौऱ्यावर होते. यावेळी पत्रकारांशी संवाद साधताना त्यांनी उपरोक्त मत व्यक्त केले. ते म्हणाले, शरद पवार आमच्यासोबत आले असते तर आज या देशाचे राष्ट्रपती झाले असते. आताही त्यांचे स्वागतच आहे. शरद पवार व अजित पवार एकत्र होते. आजही ते एकत्रच आहेत. अजित पवारांचे एकच म्हणणे होते की, तुम्हाला शिवसेना चालते तर मग भाजप का चालत नाही?

शरद पवारांसारखा माणूस आमच्यासोबत आला असता तर त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या खांद्याला खांदा लावून देशाच्या प्रगतीसाठी शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी काम केले असते. कदाचित ते राष्ट्रपतीही झाले असते. अजूनही ती वेळ गेली नाही. शरद पवार व अजित पवार हे एकत्र आले आणि त्यांचा एनडीएला पाठिंबा मिळत असेल तर शरद पवारांचे स्वागतच आहे, असे ते म्हणाले.

रामदास आठवले यांनी यावेळी राज व उद्धव ठाकरे यांच्या संभाव्य युतीवरही भाष्य केले. ते म्हणाले, उद्धव ठाकरे व राज ठाकरे आणि शरद पवार व अजित पवार एकत्र येत असतील तर मला व प्रकाश आंबेडकर यांनाही एकत्र यावे लागेल. पण मला असे वाटते की राज व उद्धव ठाकरे एकत्र येणार नाहीत. आले तरी त्यामुळे महाविकास आघाडीत फूट पडेल आणि त्याचा अप्रत्यक्ष फायदा आम्हाला मिळेल. या दोघा भावांना एकत्र यायचे असेल तर यावे. पण त्यामुळे महाराष्ट्राच्या राजकारणात फारसा फायदा होणार नाही, असे आठवले म्हणाले.

रामदास आठवले यांनी यावेळी भारत-पाक वादात अमेरिकन राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांची मध्यस्थी जोरदारपणे फेटाळून लावली. पाक हा अतिरेक्यांना प्रोत्साहन देणारा देश आहे. आम्हाला डोनाल्ड ट्रम्प यांच्याविषयी आदर आहे. पण पाकव्याप्त काश्मीर भारताच्या ताब्यात आलेच पाहिजे. त्यासाठी युद्ध केले पाहिजे. वेळ आली तर पाकलाही ताब्यात घेतले पाहिजे, ही भूमिका मी अनेकदा मांडली. आम्हाला डोनाल्ड ट्रम्प किंवा इतर कोणत्याही नेत्याची मध्यस्थी नको आहे. पाकने दहशतवादी कारवाया थांबवून पीओके आम्हाला दिला तर भारत थेट पाकशी चर्चा करण्यास तयार आहे. यामुळे युद्धाची गरजच भासणार नाही, असे ते म्हणाले.

## छत्रपती संभाजीनगरच्या पाणीटंचाईवरून इम्तियाज जलील यांची सरकारवर टीका



**छत्रपती संभाजीनगर** : एमआयएमचे नेते इम्तियाज जलील यांनी पत्रकार परिषद घेत छत्रपती संभाजीनगर येथील पाणी प्रश्न उपस्थित केला. यावेळी त्यांनी सरकारवर टीकाही केली आहे. पाण्यामध्ये मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार झाल्याचा आरोपही त्यांनी यावेळी बोलताना केला आहे.

इम्तियाज जलील म्हणाले, सत्तेमध्ये असताना लोकांना तहानलेले ठेवले. आजकाल जे आदित्य ठाकरे करत आहेत, तेच काही वर्षांपूर्वी देवेंद्र फडणवीस करत होते. त्यांनी हंडा मोर्चा काढला होता. त्यांचे सरकार एवढ्या वर्षांपासूनची होती त्यांना पाणी पाजायचे असते तर पाणी पाजू शकले असते. पण भाजप आणि शिवसेना यांची जेव्हा महानगरपालिकेमध्ये युती सरकार होती तेव्हा औरंगाबादच्या पाण्याचा ठेका भारतीय जनता पार्टीचे राज्यसभेचे आमदार मालक सुभाष चंद्र गोयल यांची कंपनी समांतरला देण्याचं निर्णय घेतला होता.

इम्तियाज जलील म्हणाले, पाण्याचा ठेका एका प्रायव्हेट कंपनीला देण्याचा निर्णय तेव्हा घेण्यात आला होता. शहरांमध्ये पाण्याची समस्या झालीच कस काय दहा बारा दिवस पाणी येत नाही. याच्या मागचे कारण माझे यामध्ये त्यांचे कमर्शियल इंटरेस्ट होते. हे काय रॉकेट सायन्स नाहीये हे देवेंद्र फडणवीस आणि आदित्य ठाकरे दोघांनाही माहित आहे.

इम्तियाज जलील म्हणाले, जेव्हा पाण्याचे कॉन्ट्रॅक्ट देण्यात आला होता तेव्हा मंत्र्यांनी अनेक दिवस असेही केले नव्हते हवा तेवढा पैसा त्यातून कमिशन म्हणून मिळत नव्हता. एकीकडे जनता तहानलेली असताना तुम्हाला पाण्यातूनही पैसा काढायचा होता. ५० किलोमीटरची लाईन आहे, जायकवाडी धरणापासून येईपर्यंत आणायचे आहे त्याचा कॉस्ट एसकलेशन जर आपण पाहिले दर दोन महिन्यानंतर दहा टक्क्यांनी वाढत होते.

इम्तियाज जलील म्हणाले, मोठे मोठे मंत्री औरंगाबाद मधले ठेकेदार हे सगळे तिहार जेलमध्ये जाऊ शकतात एवढा पैशांची लूट त्यांनी केली आहे. आता आदित्य ठाकरे येत आहेत यापूर्वी देवेंद्र फडणवीस आले होते तेव्हा त्यांनी मोठे मोठे हांडे महिलांना दिले होते आणि त्या महिला त्या हांडे घेऊन देवेंद्र फडणवीस येत होत्या तेव्हा हांडे घेऊन नाचत होते. म्हणजे जसं काही देवेंद्र फडणवीस पाणी घेऊनच येत आहेत.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार १६ मे २०२५

## यश दाभाडे ९५ टक्के घेऊन शाळेतून प्रथम क्रमांक पटकाविला



**छत्रपती संभाजीनगर** : मनपा केंद्रीय प्राथमिक व माध्यमिक विद्यालय मुकुंदवाडी छत्रपती संभाजीनगर यश दाभाडे ९५ टक्के घेऊन शाळेतून प्रथम क्रमांक पटकाविला. मुख्याध्यापक श्री चौधरी के. बी., वर्गशिक्षक श्रीमती आक्षे मॅडम, श्रीमती कुलकर्णी मॅडम, श्रीमती मंगल निकम मॅडम पुष्प गुच्छ देऊन स्वागत केले

## तिफण - लोकवाद्ये विशेषांक साहित्य पाठविण्याचे आवाहन

**कन्नड** : भाषा, साहित्य, कला आणि लोकसंस्कृतीला वाहिलेले त्रैमासिक तिफण हे सातत्याने नाविण्यपूर्ण विशेषांक प्रसिद्ध करीत असते. महाराष्ट्रात व महाराष्ट्राबाहेर विविध प्रकारची लोकवाद्ये वाजविली जातात.

सण, उत्सव, यात्रा, लग्न प्रसंगी, मर्तिकाची, विविध देवदेवतेची, धर्माची तसेच जाती-जमातीची अशी अनेक पारंपरिक लोकवाद्ये आजही पहावयास मिळतात.

ही लोकवाद्ये आजही आपले स्वतंत्र अस्तित्व व वेगळेपण जपून आहेत. ही लोकवाद्ये वाजविण्याची पद्धतही स्वतंत्र आहे. आजही ही लोकवाद्ये आपणास भूरळ टाकतात.प्रत्येक लोकवाद्याचे ताल, ध्वनी, सूर, हे भारावून टाकणारे असतात.

या सर्व लोकवाद्यांची एकत्रित माहिती उपलब्ध व्हावी, त्याचे संकलन होऊन त्यांचा अभ्यास व्हावा, तसेच ही लोकवाद्ये वाजविणारे लोक कलावंत (जे आजही दुर्लक्षितच आहेत) या सर्वांची दखल घेऊन ती समाजासमोर यावीत या महत्वपूर्ण उद्देशाने त्रैमासिक तिफण तर्फे लोकवाद्ये विशेषांक प्रसिद्ध करण्यात येणार आहे.

लोकवाद्याचा इतिहास, परंपरा, वाजविण्याचे कौशल्य, लोकवाद्ये वाजविणारे लोककलावंत, विशिष्ट प्रसंगी वाजविले जाणारे लोकवाद्य तसेच विविध जाती-जमातीची लोकवाद्ये, त्यांच्या मुलाखती, लोकवाद्यावरील कविता, कथा, ललित, रिपोर्ताज यासंबंधी सविस्तर माहिती असणारे स्वलिखित लेख, संबंधित छायाचित्रासह tifanprakashan२०२४@gmail.com या ईमेलवर जून 2025 पर्यंत युनिकोड, वर्ड फाईल फॉंड साइज 12 ,A४ साईजमध्ये शुद्धलेखनासह पाठवावा. सोबत लेखकांचाही पासपोर्ट फोटो पाठविणे आवश्यक आहे.

लेख चार ते पाच पानांचा असावा.काही लोकवाद्यांची यादी आपल्या अवलोकनार्थ :ताऱ्या, मांजरी, नंगोरा, तुडूम, कुंडीळ, डफरी, किंगरी, संबळ, दिमडी, सुंद्री, हलगी, ढोलकी, घुमट, मृदंग, टिपरी, तारपा, पावरी, सुंदरी, भेरी, घांगळी, बुलबुल, वीणा, डमरू, शंख, बासरी, घंटा, काशाची थाळी, नगारा, तुतारी, टाळ, बिगुल, पुंगी, सतार, खंजेरी, सनई, चिपळ्या, खुळखुळा, तुणतुणे, तबला, ढोल, डफ, ताशा, घुंगरू , एकतारी ईत्यादी.तरी आपण आपले साहित्य उपरोक्त ईमेलवर पाठवून या उपक्रमात सहभागी व्हावे.

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

# १० वी गुणवंत विद्यार्थी सत्कार सोहळा







**उमरगा (प्रा. नागसेन कांबळे) :** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक विभाग, लातूर अंतर्गत घेण्यात आलेल्या १० वी बोर्ड परीक्षेतील यशस्वी व गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ..आज श्री. छत्रपती शिवाजी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात.. शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळ, बलसूर या संस्थेचे सचिव आदरणीय प्रा. सुरेशदाजी बिराजदार साहेब यांच्या अध्यक्षतेखाली कार्यक्रम घेऊन गुणवंत विद्यार्थ्यांचा व पालकांचा सत्कार मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला.

सत्कार सोहळा कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे कोषाध्यक्ष श्रीमान दत्तात्रय (काका) बिराजदार, संचालक श्रीमान माधवराव पाटील, प्राचार्य श्रीमान सोमनाथ आवताडे, पर्यवेक्षक श्रीमान सतीश वाकडे, तंटामुक्ती अध्यक्ष श्रीमान प्रदिप पाटील, उपाध्यक्ष श्रीमान सत्यनारायण जाधव, उपसरपंच श्री. आयुब पटेल, ग्राम पंचायत सदस्य श्री. पवन पाटील, दैनिक एकमत तालुका प्रतिनिधी श्री. अमोल पाटील, उद्योजक श्री. किशोर माञे, सामाजिक कार्यकर्ते श्री. माधव नांगरे, श्री. ईश्वर साखरे, श्री. बाबुराव शिंदे, श्री. अशोक कुंभार व श्री. महादेव माञे उपस्थित होते.

प्रथमत: विद्यालयाच्या वतीने प्रमुख पाहुण्यांचे स्वागत करण्यात आले.श्री. छत्रपती शिवाजी विद्यालयातील १९ विद्यार्थ्यांनी बोर्ड परीक्षेत ९० टक्क्या पेक्षा जास्त गुण घेऊन यशाची परंपरा कायम ठेवले.विद्यालयाचा शेकडा निकाल - ९६.९६ %. गुणवंत विद्यार्थी प्रथम- कु. साखरे ज्योती राजेंद्र - ९८.४० %., द्वितीय- बिराजदार साईराज ब्रिजेश - ९७.२० %, तृतीय- पोतदार शिवानंद चंद्रकांत - ९७.०० %. ९० % च्या पुढील १९ गुणवंत विद्यार्थी कु. मुगळे संजीवणी प्रताप - ९५.४० %, कोळी जयराज वाल्मिक - ९४.२०%, कु. बिराजदार स्नेहल बालाजी - ९४.२०%, कु. इनामदार अल्फीया मुबारक - ९३.८० %, नांगरे आशिष महादेव - ९३.२० %, कु. पाटील कादंबरी सतीश - ९३.०० %, कु. पाटील गायञी दगडु - ९२.६० %, पुजारी समर्थ महादेव - ९२.६०%, कु. राठोड नंदिनी रावण - ९२.४० %, कु. काळे राखी किशोर - ९१.८० %, कु. साखरे निकिता मनोज - ९१.६० %, गोरे तन्मय धनराज - ९१.२० %, कु. राठोड गीता सुनिल - ९१.०० %, कु. खुंटेगावे दिपाली रविकिरण - ९०.८० %, गोरे ओम महादेव - ९०.२० %, कु. शेख मेहराज रसुल - ९०.०० %.व गणितात १०० पैकी १०० मार्क व इतिहास १०० पैकी ९९ गुण विद्यार्थ्यांनी घेतल्याबद्दल विषय शिक्षक श्री. अविनाश सुरवसे व श्री. जयचंद्र जाधव या गुणवंत विद्यार्थ्यांनी व शिक्षकांनी यशाची परंपरा कायम ठेवल्या बद्दल मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

सत्कार सोहळ्याच्या निमित्ताने प्राचार्य श्रीमान सोमनाथ आवताडे, पालक श्री. वाल्मिक कोळी, प्रा. एन टी तेलंग व गुणवंत विद्यार्थीनी कु. ज्योती साखरे यांनी मनोगत व्यक्त केले. ग्रामीण भागातील विद्यार्थी लातूर येथे क्लासेसला न जाता ११वी, १२ वी च्या विद्यार्थ्यांसाठी NEET, JEE MHT- CET स्पर्धा परीक्षेच्या तयारीसाठी आपल्या विद्यालयात स्पेशन बॅच व अभ्यासिका जून पासून घेण्यात येणार आहे.

असे आजच्या कार्यक्रमात संस्थेचे सचिव सुरेशदाजींनी पालकांना सांगुन, प्राध्यापकांना स्पेशल बॅचचे नियोजन करण्यास सांगितले.यावेळी क्रीडाशिक्षक श्री. एम डी काळे, परमेश्वर नागरगोजे, विश्वजीत बिराजदार, दत्तात्रय जाधव, श्रीमती जयश्री बुवा, सुनिता साळुंके, श्री एन आर तेलंग, भैरवनाथ सर्जे, प्रा. डी आर राठोड, यु पी कांबळे, पी आर का`बळे, गोवर्धन पाटील, सचिन चव्हाण, वामन भोरे, ईराप्पा पोतदार, विजय घोडके, वर्षा जगताप, पाटील मॅडम, श्री. के डी कांबळे, ओमकार जमादार, मधुकर सरवदे, राजूदास चव्हाण, बालाजी मुर्टे, अविनाश कोळी, रदयनाथ कवठे, निलेश सुर्यवंशी, पालक व गुणवंत विद्यार्थी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रस्ताविक व सुञसंचलन प्रा. पी बी सुर्यवंशी यांनी केले तर सांस्कृतिक विभाग प्रमुख श्री. बळीराम नांगरे यांनी अभार मानले.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार १६ मे २०२५



१० वी, १२ वी पास (कोणतीही शाखा) विद्यार्थ्यांसाठी सुवर्ण संधी

D.M.L.T

Diploma In Medical Laboratory Technology

- महाराष्ट्र पॅरामेडीकल कॉन्सीलमध्ये नोंदणी करता येते.
- सरकारी / निमसरकारी हॉस्पीटलमध्ये लॅब असिस्टंट होण्याची संधी.
- शासकीय नोकरीसाठी मान्यता प्राप्त.
- हा कोर्स झाल्यानंतर डायरेक्ट BSC ला अॅडमीशन भेटेल ११ वी, १२ वी सायन्स करण्याची गरज नाही.

डॉ.दत्ताभाऊ पाथ्रीकर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित

मातोश्री डॉ.कंचन शांतीलालजी देसरडा पॅरामेडिकल कॉलेज.

बीबीका मकबऱ्याच्या मागे, हनुमान टेकडीजवळ, पहाडसिंगपुरा, छ.संभाजीनगर (औरंगाबाद.)

9405109103
8830838903


# आता लालपरीत होणार एआय तंत्रज्ञानाचा वापर



**मुंबई** : पुण्यातील स्वारगेट बसस्थानकावर झालेल्या अत्याचाराच्या घटनेनंतर राज्य सरकारने प्रवाशांच्या सुरक्षेला गांभीर्याने घेतले आहे. प्रवासात बसमध्ये प्रवाशांसोबत कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यात येणार आहेत. तसेच हे कॅमेरे एआय तंत्रज्ञानावर आधारित असणार आहेत.

नव्या लालपरीसह आता सर्वच बसेसमध्ये एआय तंत्रज्ञानावर आधारित कॅमेरे, जीपीएस तंत्रज्ञान एलईडी, टीव्ही, वायफाय, चोरी प्रतिबंध तंत्रज्ञानावर आधारित बस लॉक सिस्टम असे आधुनिक तंत्रज्ञान लावण्यात येणार आहेत, अशी माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली आहे. नुकत्याच एसटी प्रशासनाने नव्या ३ हजार बसची खरेदी केली. या खरेदीच्या अनुषंगाने बोलावण्यात आलेल्या बस बांधणी कंपन्यांच्या बैठकीत प्रताप सरनाईक बोलत होते.

मंत्री प्रताप सरनाईक म्हणाले, स्वारगेट बसस्थानकावरील घटनेच्या पार्श्वभूमीवर प्रवाशांच्या सुरक्षेला यापुढे अत्यंत महत्त्व दिले जाणार आहे. प्रवासात बसेसमध्ये प्रवाशांसोबत कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यात येणार आहेत. तसेच चालकाच्या गाडी चालवण्याच्या पद्धतीवर देखील कॅमेराचे लक्ष असणार आहे. तसेच बसस्थानक व परिसरात पार्किंगमध्ये उभ्या असलेल्या बसेस देखील पूर्णतः बंद राहतील, अशी यंत्रणा बसमध्ये बसवण्यात येणार आहे.

# 'पोहेकॉ'लाही गुन्ह्याचा तपास करण्याचा अधिकार

**मुंबई** : राज्यातील गुन्हेगारीचे प्रमाण झपाट्याने वाढत असताना राज्याच्या गृह विभागाने 'पोहेकॉ' अर्थात पोलिस हेड कॉन्स्टेबलांना गुन्ह्यांचा तपास करण्याचा अधिकार देण्याचा महत्वपूर्ण निर्णय घेतला आहे. सरकारच्या या निर्णयामुळे गुन्ह्यांच्या तपासाला वेग येण्याची शक्यता आहे.

राज्यातील वाढते शहरीकरण व गुन्हेगारीच्या घटनांमुळे पोलिस यंत्रणेवर प्रचंड ताण येत आहे. हा ताण कमी करण्यासाठी गृह विभागाने पोलिस हेड कॉन्स्टेबललाही गुन्ह्यांचा तपास करण्याचे सशर्त अधिकार दिलेत. आतापर्यंत हा अधिकार केवळ पोलिस उपनिरीक्षक पदापर्यंतच्या अधिकाऱ्यांना होता. पण आता त्यात पोहेकॉचीही भर पडली आहे. गृह विभागाने ९ मे रोजी जारी केलेल्या आपल्या राजपत्राद्वारे ही माहिती दिली आहे.

या राजपत्रानुसार, गुन्ह्यांचा तपास करण्यासाठी पोलिस हेड कॉन्स्टेबल किमान पदवीधर असावा. त्याची ७ वर्षांची सेवा पूर्ण झाली असावी. तसेच गुन्हे अन्वेषण प्रशिक्षण विद्यालय नाशिक येथील ६ आठवड्यांचे विशेष प्रशिक्षण पूर्ण व परीक्षा उत्तीर्ण असावा.


१२ वी सायन्स व B.Sc. पास विद्यार्थ्यांसाठी

शासन मान्यताप्राप्त जॉबगॅरंटी कोर्सेस

DMLT
कालावधी २ वर्ष
पात्रता : १२ वी सायन्स

PGDMLT
कालावधी दिड वर्ष (३ सेमिस्टर)
पात्रता : B.Sc.
(Microbiology, Chemistry, Botany, Zoology, Biochemistry, MLT, CLS)

X-RAY
कालावधी १ वर्ष
पात्रता : १०वी ,१२ वी पास

C.T.SCAN
कालावधी १ वर्ष
पात्रता : १०वी ,१२ वी पास

E.C.G.
कालावधी १ वर्ष
पात्रता : १०वी ,१२ वी पास

O.T. TECHNICIAN
कालावधी २ वर्ष
पात्रता : १०वी ,१२ वी पास

PG RADIOLOGY
कालावधी दिड वर्ष (३ सेमिस्टर)
पात्रता : B.Sc. Physics

रेडिओलॉजी
कालावधी २ वर्ष
पात्रता : १२ वी सायन्स पास

फिजिओथेरपी
कालावधी २ वर्ष
पात्रता : १२ वी सायन्स पास

ऑप्थोमेट्री
कालावधी २ वर्ष
पात्रता : १२ वी सायन्स पास

9405109103 | 8830838903



मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी.सेंटर

साहिल कॉम्प्युटर्स अॅण्ड प्रिंटर्स

डॉ.बा.आं.म.विद्यापीठ गेटजवळ, जयसिंगपुरा, औरंगाबाद.
मो. 8087880274, 8956362639, 9270446603, 9405109103

डी.टी.पी. (मराठी, हिंदी, इंग्रजी)

- प्रोजेक्ट रिपोर्ट
- डेझर्टेशन
- पीएच.डी./एम.फिल.थेसिस
- कलर प्रिंट
- डी.एड.,एम.एड.प्रोजेक्ट
- स्कॅनिंग
- स्पायरल व हार्ड बायडींग
- लॅमिनेशन

महाराष्ट्रातील सर्वच विद्यापीठाच्या 1300 पेक्षा जास्त पीएच.डी. 1500 एम.फिल., 4000 हून अधिक डेझर्टेशनचा अनुभव, कुशल ऑपरेटर्स, लाईट गेल्यास इन्व्हर्टरची सोय असलेले मराठवाड्यातील नं. 1 चे डी.पी.पी. सेंटर

अनुभव नसलेल्यांकडे जाऊन मानसिक व आर्थिक त्रास करून घेण्यापेक्षा.. अनुभवी ऑपरेटर्सकडून अचूक व उत्कृष्ट कामासाठी अवश्यक संपर्क साधा.

Contact No.- 8956362639 / 8087880274
Email - sahilcomputer05@gmail.com

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार १६ मे २०२५

# समुपदेशनाने होणार पशुसंवर्धन विभागातील अधिकाऱ्यांच्या बदल्या



**पुणे :** पुन्हा एकदा इतिहास घडवताना या ऐतिहासिक क्षणाची मी साक्षीदार होत आहे याचा मला अतिशय आनंद होत आहे. अधिकाऱ्यांचे मनोबल वाढवून भ्रष्टाचारमुक्त धोरण राबविणे यासाठी पशुसंवर्धन विभागातील अधिकाऱ्यांच्या समुपदेशनाने बदल्या करण्याचा निर्णय मी घेतला. हा निर्णय भविष्यातही कायम राहील. गाव पातळीवर कष्ट करणाऱ्या सर्व सामान्य लोकांच्या चेहऱ्यावरचा आनंद माझ्यासाठी महत्वाचा आहे. तुमच्या बदल्या मनासारख्या केल्या आहेत, आता चांगले आणि फ्रेश मनाने काम करा, अशा शब्दांत राज्याच्या पर्यावरण व वातावरणीय बदल तसेच पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी आज अधिकाऱ्यांशी संवाद साधला.

राज्याच्या सर्व भागात मनुष्यबळाचा समतोल साधला जावा आणि बदल्यांची प्रक्रिया पारदर्शकपणे पार पाडावी यासाठी पशुसंवर्धन विभागातील पशुधन विकास अधिकारी व सहाय्यक आयुक्त या संवर्गातील बदल्या समुपदेशनाने करण्याचा ऐतिहासिक निर्णय पंकजा मुंडे यांनी नुकताच घेतला होता. या बदल्यांची प्रक्रिया आजपासून आयुक्त पशुसंवर्धन यांच्या कार्यालयात पंकजा मुंडेंच्या उपस्थितीत सुरू झाली, त्यावेळी त्या बोलत होत्या. पशूसंवर्धन विभागाचे सचिव एन. रामास्वामी, आयुक्त प्रवीण कुमार देवरे, अतिरिक्त आयुक्त डॉ. शीतल मुकणे यावेळी उपस्थित होते.

ग्रामविकास मंत्री असताना शिक्षकांच्या ऑनलाईन बदल्यांचा निर्णय मी घेतला होता, त्यावेळी त्याचा फायदा अनेक शिक्षकांना जे तिथपर्यंत पोहोचू शकत नव्हते त्यांना झाला. आऊट ऑफ बॉक्स जाऊन निर्णय घेण्याची आवड असल्याने आताही पशुसंवर्धन विभागासाठी मी हा निर्णय घेतला. एकदा घेतलेला निर्णय बदलत नाही, त्यामुळे भविष्यातही हा निर्णय कायम राहणार आहे. माझे वडील लोकनेते मुंडे साहेब नेहमी म्हणायचे, ज्याची पत नाही, ऐपत नाही त्यांचा आवाज बनण्यासाठी मी राजकारणात आहे, अगदी तोच वारसा घेऊन मी काम करत आहे. माझ्यावर प्रेम करणारे असंख्य लोक आहेत, त्यांच्यासाठी तुम्ही काम करता, त्यामुळे हा निर्णय घेतला. सर्व सामान्य लोकांच्या चेहऱ्यावरचा आनंद मला महत्वाचा वाटतो. वर्षानुवर्षे एकाच ठिकाणी आपल्या परिवारापासून दूर असणारे, आदिवासी क्षेत्रात काम करणाऱ्या अधिकाऱ्यांना यामुळे हवी ती पोस्टींग मिळणार आहे. हव्या त्या ठिकाणी बदल्या झाल्याने तुमच्या चेहऱ्यावर दिसलेला आनंद समाधान देणारा आहे असं पंकजा मुंडे यावेळी म्हणाल्या.

समुपदेशनाने बदल्यांची कार्यवाही आजपासून सुरू झाली असून उद्याही म्हणजे 16 मे रोजी ही कार्यवाही सुरू असणार आहे. आज आदिवासी व नक्षलग्रस्त अवघड क्षेत्रात असलेल्या 118 आणि बिगर अवघड क्षेत्रात असलेल्या 444 अधिकाऱ्यांच्या बदल्या त्यांच्या मनाप्रमाणे करण्यात आल्या. पंकजा मुंडे यांनी घेतलेल्या निर्णयामुळे मनाप्रमाणे आणि सहजतेने हवी ती पोस्टींग मिळाल्याने अधिकारी वर्गात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

मी यवतमाळ जिल्ह्यातील आहे, माझी पहिली पोस्टींग 2022 मध्ये त्र्यंबकेश्वर येथे झाली. आदिवासी क्षेत्रात तीन वर्ष सेवा दिली. आता समुपदेशनाने मला माझा जिल्हा मिळाला. मला खूप आनंद झाला. पंकजा मुंडे यांनी घेतलेला निर्णय आमच्या सारख्या अधिकाऱ्यांचे मनोबल वाढविणारा आहे, असे डॉ. आकाश ठाकरे म्हणाले.

मी सिरोंचा तालुक्यात कार्यरत होते. हा भाग तेलंगणा सीमेवर असल्याने इथे मराठीपेक्षा तेलगू बोलली जाते. मला तेलगू भाषा येते.खेड्यातील लोकांशी चांगला संवाद साधता येतो. लोकं म्हणाले तुमची बदली झाल्यावर आमचे कसे होईल? आता समुपदेशनाने मी इथेच राहिले. हवे असलेले ठिकाणी मिळाल्याने मी खूश आहे. खरचं हा निर्णय ऐतिहासिक आहे. मंत्री महोदय पंकजाताईंचे खूप खूप आभार, अशा भावना डॉ. प्रियंका स्वामीदास यांनी व्यक्त केल्या.




